# VIVEK TUTORIALS

VIII (New) (English)

(Special Test)

Marathi-

DATE: 23-02-19

TIME: 1 hour

MARKS: 25

SEAT NO:

विभाग १ - गदय

Q.1 उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1 A1) i) विधान पूर्ण करा. 1

1) आम्हांला तुमची गरज आहे; ............... .

2) माणसाच्या द्याबुद्धीला, करुणेला ............... .

ii) चौकटी पूर्ण करा 1

जनावराचे इस्पितळ मुंबईच्या या भागात - [ ]

मुंबईच्या परळ भागात एक इस्पितळ आहे. ते आहे जनावरांचं इस्पितळ. ते आतून बघायचं असं माझ्या मनात खूप दिवसांपासून होतं. एकदा तो योग आला. कमानीच्या आत तर सहज प्रवेश मिळाला. उजवीकडं एक छोटीशी इमारत दिसते. हे बहुधा कार्यालय असावं. कार्यालयाच्या दाराशीच भिंतीवर एक मोठी तसबीर आहे. त्या तसबिरीत बैल, घोडा, कुत्रा, मांजर, शेळी अशी वेगवेगळ्या जनावरांची चित्रं आहेत. खाली एक छोटंसं पण मनाला भिडणारं वाक्य आहे, 'आम्हांला तुमची गरज आहे; तुम्हांला आम्ही हवे आहोत का?'

माणसाच्या दयाबुद्धीला, करुणेला मुक्या प्राण्यांनी केलेलं ते आवाहन होतं. मला आत कुठंतरी हालवून सोडतं. आता मी कार्यालयात पाऊल टाकते. समोरच्या कपाटावर उदी रंगाचा एक गलेलठ्ठ बोका मजेत आपल्या मिशा साफ करत बसला आहे. मला बघताच तो कपाटावरून उडी मारतो आणि साहेबांच्या टेबलावर येऊन बसतो.

इस्पितळ बघण्यासाठी मी आले आहे, असं मी त्या साहेबांना सांगते. बोक्याचं डोकं कुरवाळत ते माझं ऐकून घेतात आणि लगेच मला परवानगी देऊन टाकतात. इतकंच नाही, तर मला सारं इस्पितळ नीट दाखवण्यासाठी भरत नावाचा एक छोटा चुणचुणीत मुलगाही ते माझ्याबरोबर देतात.

A2) i) योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा 1

1) मुंबईच्या ............... भागात एक इस्पितळ आहे.

अ.दादर ब. कुर्ला क. माहिम ड. परळ

2) आता मी .............. पाऊल टाकते.

अ. बागेत ब. शाळेत क. कार्यालयात ड. घरात

ii) खालील विधानांनपैकी अचूक विधाने लिहा. 1

i. आम्हांला तुमची गरज आहे.
ii. कपाटावर पांढराशुभ्र रंगाचा बोका होता.
iii. भरत अगदीच आळशी मुलगा होता.
iv. ते आहे जनावराचं इस्पितळ.

A3) i) सामान्यरूप तयार करा 1

1) मनात - ............... .

2) प्राण्यांनी - ............... .

ii) समानार्थी शब्द लिहा 1

1) जनावर - [ ]

2) पाऊल - [ ]

A4) स्वमत 2

'माणसाच्या दयाबुद्धीला, करुणेला मुके प्राणी कसे आवाहन करतात, ते तुमच्या अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

विभाग २ - पदय

Q.2 खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

1 A1) i) योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा 1


1) .............. च्या संगे बोरीया बाभळी |

अ. पिंपळ  ब. वड  क. चंदन  ड. तुळस

2) .............. म्हणे ऐसा परमार्थ साधवा |

अ. ज्ञाना  ब. तुका  क. जना  ड. चोखा

ii) आकृती पूर्ण करा 1




चंदनाच्या संगें बोरीया बाभळी ।
हेकळी टाकळी चंदनाची ।।१।।
संतांचिया संगें अभाविक जन ।
तयाच्या दर्शनें तेचि होती ।।२।।

चोखा म्हणे ऐसा परमार्थ साधावा ।
नाहीं तरी भार वाहावा खरा ऐसा ।।३।।

A2) पुढील काव्यपंक्तिचा योग्य क्रम लावा 2

i. हेकळी टाकळी चंदनाची ||१||
ii. संतांचिया संगे अभाविक जन
iii. चंदनाच्या संगे बोरीया बाभळी |
iv. तयाच्या दर्शनें तेचि होती ||२||

A3) स्वमत 2

संत चोखामेळा यांनी संत सहवासाच्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे?

विभाग ३ - भाषाभ्यास

Q.3 व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.

(1) समान अर्थाचे जोडशब्द तयार करा. (1)

होड्या -

(2) गटात न बसणारा शब्द ओळखा. (1)

मी, आपण, रत्ना, त्यांचे

(3) खालील वाक्यांचा प्रकार ओळखून लिहा. (1)

हा गुलाब सुंदर आहे.
तू कोणते पुस्तक वाचतोस?

(4) भाषासौंदर्य (1)

आलंकारिक शब्द
बाळकडू - ..............

विभाग ४ - उपयोजित लेखन

Q.4 खालील विषयावर पत्र लिहा. (5)

तुम्हाला लग्नासाठी परगावी जायचे आहे. त्यासाठी तुम्हाला आठ दिवसांची रजा हवी आहे. रजेसाठी विनंती करणारे पत्र तुमच्या मुख्याध्यापकांना लिहा.